# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

---

**दिनांक ०५.०९.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण १०,७४,१३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०६ केसेसमध्ये १५ इसमांवर कारवाई करून एकुण ११,५१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,८८१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ११,२९,५०२/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०४.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०५.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकाची कामगीरी :— घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस.**

फिर्यादी इमरान निसार शेख वय ३५ वर्षे रा. प्लॉट क्र. ८४, एचपी गॅस गोडावून, तोहीद नगर, नागपूर यांचे पोलीस ठाणे सक्करदरा हद्यीत सोमवारी क्वॉर्टर परिसरात मिक्की पान पॅलेस नावाची पानटपरी असून, दिनांक २६.०८.२०२६ चे २२.०० वा. ते २७.०८.२०२६ चे ०४.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे पानटपरीचे कुलूप तोडून, त्यातील सिगारेट व पानमसाला किंमती १,११५/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(४),३३२,३३४(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी क्र. १) पियुष उर्फ डिजे निलेश सोनटक्के वय १९ वर्षे रा. विनोबा भावे नगर, गली क्र. २१, प्लॉट क्र. ५८३, यशोधरानगर, नागपूर २) मोहम्मद जिशान अन्सारी वय १८ वर्ष रा. कुंदनलाल गुप्ता नगर, नुरी मस्जिदजवळ, यशोधरानगर, नागपूर व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेऊन, गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद पानटपरी फोडीचा गुन्हा त्यांचा साथीदार आरोपी क्र. ४) वृत्तांत दीपक द्रविडकर वय २१ वर्ष रा. प्लॉट क्र. ८७८, विनोबा भावे नगर, यशोधरानगर, नागपूर यांचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपी क्र. ४ यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे कोतवाली हद्यीत एक घरफोडीचा असे एकूण दोन गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३,०००/—रू. व गुन्हा करतांना वापरलेली सीडी डिलक्स

दुचाकी क्र. एमएच ३१ सीझेड ७१५९ असा एकूण २८,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १ व २ आणि विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात तसेच, आरोपी क्र. ४ यास कोतवाली पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. आरोपींकडून घरफोडीचे एकुण दोन गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— चोरीचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस शस्त्रासह अटक.</u>**

दिनांक ०४.०९.२०२६ चे १८.०० ते १९.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे खापरखेडा येथील एका चोरीचे गुन्हयातील पाहिजे आरोपी श्रीकांत गजभिये हा वानखेडे ले—आऊट परिसर, चणकापुर येथे शस्त्र घेऊन फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात शोध घेतला असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम एका टिनाचे झोपड्याचे आडोश्याला बसलेला दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव श्रीकांत उर्फ श्री बंडु गजभिये वय २१ वर्षे, रा. वार्ड क्र. २, झोडापे किराणा दुकानाजवळ, चणकापुर, ता. सावनेर जि. नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे ५००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपीचा अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे खापरखेडा येथे दाखल चोरीचे गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे दिसुन आले. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे पोनि. भरत कन्हाडे, पोउपनि. राहुल रोटे, पोहवा. नारायण पारवेकर, पोअं. सुनिलकुमार यादव, दिनेश महल्ले, रविंद्र राऊत व राहुल पाटील यांनी केली आहे.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०४.०९.२०२६ चे २१.०० ते ०५.०९.२०२६ चे ००.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, प्लॉट क्र. ११४, सारीपुत्र सोसायटी, वैष्णोमाता नगर, टेकडीवाडी, गिट्टीखदान, नागपूर येथे राहणारा ईसम नामे कोमल गंगाधर तिडके वय ४० वर्षे याचे घरी पंचासमक्ष रेड कार्यवाही करून, पाहणी केली असता, तिथे शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा व वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु, रत्ना, रजनीगंधा, बाबा ब्लॅक, माझा, आर गोल्ड जी, रिमझीम, विमल, राजश्री, सागर इत्यादी पानमसाला, तंबाखु पाऊच असा मुद्देमाल मिळुन आला. त्यास मुद्येमालाबाबत विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी सोनु म्हस्के रा. खामला, नागपूर याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा व वेगवेगळे फ्लेवरचे सुगंधीत तंबाखुजन्य पदार्थ वजनी १२५,३६७ किलोग्राम व ॲक्टिवा वाहन क्र. एमएच ४९ क्यु ६१५४ असा एकुण किंमती अंदाजे २,०४,४७०/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी किरण रंगास्वामी गेडाम वय ५१ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे कलम १२३,२२३, २७४,२७५,३(५) भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(iv)(zz),५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, सपोनि. आर. एस. जाधव व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सदर:— घरफोडीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी मोहम्मद हम्माद मोहम्मद सादिक वय ६३ वर्षे, रा. टेकडी रोड, मुस्लिम लायब्रेरी जवळ, सदर नागपूर यांचे पोलीस ठाणे सदर हद्यीत कराची गल्ली येथे सादीक ॲन्ड सन्स नावाचे जनरल स्टोअर्स आहे. फिर्यादी यांनी दिनांक ०३.०९.२०२६ चे रात्री आपले दुकान बंद करुन घरी गेले असता, दिनांक ०४.०९.२०२६ चे ०२.४५ वा. चे सुमारास त्यांना त्यांचे दुकानाचे शेजारी यांनी माहिती दिली की, कोणीतरी अज्ञात चोरटे तुमच्या

दुकानाचे कुलुप तोडत आहे. अशा माहितीवरुन फिर्यादी आपले दुकानाजवळ आले असता, त्यांना दुकानात दोन इसम चोरी करतांना प्रत्यक्ष मिळून आले. त्यांना पकडून व पोलीसांना सुचना दिली असता, पोलीसांनी घटनास्थळावरुन आरोपी क्र. १) गणेश उर्फ गन्ना उर्फ सुलतान आनंद बुरडे वय ४१ वर्ष रा. विटाभट्टी चौक, गांधीपुतळ्याजवळ, यशोधरानगर, नागपूर २) लोकेश उर्फ खोका धनराज नरांजे वय ५१ वर्ष रा. भानखेडा, सिदधार्थ वाचनालयाजवळ, तहसील, नागपूर यांना ताब्यात घेऊन, अटक केली आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. रुपेश जांभळे ७७४१०८८१०९ यांनी आरोपींविरूध्द कलम ३३१(४),३०५,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोराडी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०९.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, कोराडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, चिंटु भोजनालयवळ कोराडी नाका येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम हा हातात शस्त्र घेऊन धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नितीन रामायण तिवारी वय २० वर्षे रा. प्लॉट क्र. १२०, संभाजीनगर, नारा रोड, हनुमान मंदीरजवळ, जरीपटका, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे गणेशपेठ :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०९.२०२६ चे १८.४५ वा. चे सुमारास, गणेशपेठ पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत लोधीपुरा, साईमंदीर समाजभवनाचे टेरेसवर काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार—जीतचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) यशवंत भिमराज गौर वय २० वर्षे रा. भोईपुरा, गणेशपेठ २) एफाज अहमद इरफान अहमद वय २६ वर्षे, रा. तकीया दिवाणशाह, तहसील ३) क्रिश कोमल गौर वय १९ वर्षे रा. हंसापुरी, नागपूर ४) शुभम क्रिष्णा गौर वय २६ वर्षे, रा. भोईपुरा, गणेशपेठ ५) आयुष राजेश गौर वय २० वर्षे, रा. हंसापुरी, छोटी खदान, गणेशपेठ ६) साहील राजेश गौर वय २३ वर्षे, रा. मच्छीमार्केट भोईपुरा, ७) रौनक अनिल ठाकूर वय २० वर्ष रा. हंसापुरी, छोटी खदान, गणेशपेठ हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील व ताब्यातील रोख ३,६००/— रु., ५२ ताश पत्ते व इतर साहित्य असा एकुण ३,६३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे गणेशपेठ येथे कलम १२ अ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**